INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL

ISSN: 2230-7850
IMPACT FACTOR : 4.1625(UIF)
VOLUME - 6 | ISSUE - 12 | JANUARY – 2017



# भारत-चीन बदलते परराष्ट्र धोरण

**डॉ. संगमेश्वर निला**
**राज्यशास्त्र विभाग , वालचंद कॉलेज ऑफ आर्टस् ॲण्ड सायन्स, सोलापूर.**

## प्रस्तावना

आजच्या जागतिकीकरणाच्या युगात चीनसंबंधी धोरण आखताना चीनचा एक शेजारी राष्ट्र किंवा शत्रूराष्ट्र याच दृष्टिकोनातून विचार करुन चालणार नाही. तर जगाच्या नकाशावरील चीनसारख्या एका महत्वपूर्ण राष्ट्राशी महासत्तेची आकांक्षा बाळगणाऱ्या भारताचे कसे संबंध असावेत असा विचार करणे अधिक संयुक्तिक ठरेल. त्याच अनुषंगाने चीन व भारत यामधील सद्य संबंधांचा व त्यामागील संदर्भांचा उहापोह करणे व भविष्यकाळात हे संबंध कसे असतील याचा वेध घेणे हा प्रस्तुत लेखाचा उद्देश आहे.

चीनची अर्थव्यवस्था ही वेगाने विकसित होणारी अर्थव्यवस्था आहे. जपानला मागे टाकून चीनने दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याचा मान मिळविला आहे. वेगाने विकसित होणाऱ्या चीनला भारतासारख्या मोठ्या बाजारपेठेची गरज आहे. भारतालाही आर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर विदेशी गुंतवणुक आवश्यक आहे. माहिती-तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारत आघाडीवर आहे याची चीनला जाणीव आहे. याचा फायदा भारताने करुन घेतला पाहिजे. भारताच्या परराष्ट्र धोरणाची एक महत्वाची मर्यादा म्हणजे शेजारील राष्ट्रांच्या हालचाली व अर्थकारणाबाबतची अनास्था. पाकिस्तान व्याप्त काश्मीरमधील गिलगिट आणि बाल्टीस्थानच्या भागात चीनच्या मदतीने अनेक प्रकल्प पाकिस्तान सरकारने सुरु केले आहेत. चीनने सन २०१५ मध्ये नेपाळमधील ऊर्जानिर्मिती क्षेत्र, शेवया बनविण्याचे कारखाने, मांसाहार प्रक्रिया उद्योग आदींमध्ये गुंतवणूक केलेली आहे. सन २००६ मध्ये नेपाळच्या एकूण व्यापारातील ६०% हिस्सा भारताशी होणाऱ्या व्यापार होता. तो घसरुन ५३% झाला आहे. उलट चीनचा हिस्सा ३% वरुन ३१% झाला आहे. आशिया खंडात वर्चस्वासाठी भारताच्या शेजारी राष्ट्रांना आपल्या गटात समाविष्ट करण्याचा चीनचा प्रयत्न आहे. पाकिस्तानातील ग्वादार बंदराचा विकास, श्रीलंकेतील हंबनटोटा बंदर, बांग्लादेशातील चितगाव बंदर, म्यानमारमधील क्याकफ्यू बंदराच्या विकासाचे कंत्राट चीनने मिळवले आहे. आशियातील राष्ट्रांना आपल्या बाजूने वळवून भारताभोवतीचा विळखा घट्ट करण्याचा चीन प्रयत्न करतो आहे. चीनच्या या धोरणाला 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' असे म्हटले जाते. भारताने हे वेळीच ओळखायला हवे. चीनच्या संदर्भात धोरण आखताना भारताने दक्षिण आशियावरील नियंत्रण व आर्थिक हितसंबंधाचा विचार केला पाहिजे.




## परराष्ट्र धोरणाच्या बदलत्या दिशा :-

स्वातंत्र्यपुर्व कालखंडापासूनच भारताचे परराष्ट्र धोरण आदर्शवादाच्या चौकटीत आखले गेले. शांततापूर्ण सहकार्य व परस्पर विश्वास यावर आधारलेल्या परराष्ट्र धोरणाला पहिला धक्का चीनबरोबरच्या युध्दाने बसला. १९६२ च्या युध्दानंतर चीन व पाकिस्तानची वाढत चाललेली मैत्री भारत पाकिस्तान युध्द यामुळे चीन व भारत यांच्यात विश्वासाचे वातावरण निर्माण होऊ शकले नाही. जवळजवळ १५ वर्षे भारत व चीन यांच्यामधील संबंध ठप्प होते. वाजपेयी परराष्ट्रमंत्री असताना त्यांनी (१९७७-७८) व त्यानंतर राजीव गांधी (१९८५) नंतर त्यांनी चीनशी राजनैतिक व शिखर पातळीवरील संबंध प्रस्थापित करण्यात पुढाकार घेतला, तो काही प्रमाणात यशस्वी झाला.

या कालखंडातील भारताच्या परराष्ट्र धोरणाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे भारताने शेजारी राष्ट्रांशी संबंध प्रस्थापित करताना आर्थिक व व्यापारी संबंधांना कधीच प्राधान्य दिले नाही. भारत-चीन संबंध वृध्दिंगत होण्यास खरी सुरुवात झ

ाली ती शीतयुध्दानंतरच्या काळात. शीतयुध्दोत्तर काळात आंतरराष्ट्रीय राजकारणात व अर्थकारणात अनेक बदल झाले. या बदलांचा सकारात्मक परिणाम भारत-चीन संबंधावरही झाला. १९८० च्या दशकात चीनने आर्थिक आघाडीवर आपले दरवाजे खुले करण्यास सुरुवात केली. १९९० च्या सुरुवातीला भारतामध्येही आर्थिक सुधारणा, खुली अर्थव्यवस्था व उदारीकरणाची प्रक्रिया सुरु झाली. आर्थिक आघाडीवर दोन्ही देश भरभराटीला यायला लागल्यानंतर परस्परांशी व्यापारी संबंध प्रस्थापित करण्याची गरज दोन्ही देशांना भासू लागली. त्यातूनच एक नविन विचार पुढे आला. व्यापारी संबंध वृध्दिंगत करण्यावर भर देणे आणि यातून परस्पर विश्वास व सहकार्याचे वातावरण निर्माण करणे. याशिवाय भारत-चीन संयुक्त कृती गटाची स्थापना, राजनैतिक पातळीवरील गाठीभेटी आणि आर्थिक व व्यापारी देवघेव अशा विविध मार्गांनी विश्वासार्हता निर्माण करण्यासाठी दोन्ही बाजूंनी प्रयत्न केले जाऊ लागले.

चीनच्या संदर्भातील धोरण आखताना भारताने इतरही महत्वाच्या मुद्यांकडे लक्ष द्यायला हवे. चीनची अर्थव्यवस्था ही वेगाने विकसित होणारी व्यवस्था आहे. जपानला मागे टाकून चीनने दुसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याच्या मान मिळविला आहे. २००८-०९ या वर्षीच्या आर्थिक अरिष्टाने अमेरिका व युरोपीय अर्थव्यवस्था कोलमडल्या असतानाही चीन या धक्क्यापासून सावरुन परत वेगाने आर्थिक प्रगती करु लागला आहे. वेगाने विकसित होणाऱ्या चीनला भारतासारख्या मोठ्या बाजारपेठेची गरज आहे. भारतालाही आर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर विदेशी गुंतवणूक आवश्यक आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारत आघाडीवर आहे याची चीनला जाणीव आहे. याचा फायदा भारताने करुन घेतला पाहिजे. देशाच्या सुरक्षेला ज्यातून बाधा होणार नाही अशा क्षेत्रात चिनी गुंतवणुकीचे स्वागत केले पाहिजे.

चीनची वाटचाल दुसऱ्या क्रमांकाच्या महासत्तेकडे चालल्याने संरक्षण क्षमताही तितक्याच वेगाने वाढविण्याचे चीनचे प्रयत्न चालविले आहेत. चीनला गेल्या काही वर्षात रशियाकडून अतिप्रगत लढाऊ विमाने, क्षेपणास्त्र यंत्रणा, पाणबुड्या व इस्त्रायलकडून आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध झाले आहे. रशियाकडून उत्पादने मिळवताना चीनने उत्पादनाचे हक्कही मिळविले आहेत. शस्त्रास्त्रांच्या बाबतीत स्वयंपूर्णता मिळविण्याबरोबरच चीनने शस्त्रास्त्र निर्यातीवरही भर दिलेला दिसतो. बांग्लादेश, बर्मा व श्रीलंका या भारताशेजारील राष्ट्रांबरोबरच सुदान, इराण, नायजेरिया आदी राष्ट्रांना तो शस्त्रपुरवठा करतो. लष्करी संबंध प्रस्थापित करुन मित्र राष्ट्रांची संख्या वाढविणे हा त्यामागचा हेतू आहे. त्यामुळे भारताने त्या बाबतीत सतर्क राहणे आवश्यक आहे.

### शितयुध्दोत्तर दक्षिण आशियाई सत्तासमतोल :-

चीनचा दक्षिण आशियातील वाढता प्रभाव हा देखील अमेरिकेचे दक्षिण आशियाविषयक शितयुध्दोत्तर धोरण ठरविण्यातील एक महत्वाचा घटक आहे. दोन्ही राष्ट्रे या क्षेत्रात आपला प्रभाव वाढविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. अमेरिकन संरक्षण विभागाच्या २००५ च्या वार्षिक अहवालागत चीनच्या वाढत्या लष्करी सामर्थ्याची गंभीर दखल घेतल्याचे दिसते (देवळाणकर : २०१० : १५७). चीनच्या वाढत्या प्रभावामुळे अमेरिकेस अनुकूल असा दक्षिण आशियातील सत्ता समतोल बिघडण्याची भिती अमेरिकेला वाटते. चीनच्या वाढत्या प्रभावाचे प्रतिरोधन करण्यासाठी भारताला प्रतिस्पर्धक म्हणून पुढे करण्याचा अमेरिकेचा प्रयत्न आहे. अमेरिकेचे हे धोरण भारत-चीन-रशिया आघाडीची कसोटी ठरणार आहे.

### पूर्व आशियाप्रती भारताची ग्रॅड स्टॅटेजी :-

शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर भारताचे पूर्व आशियातील स्थान परिघावरुन केंद्रभागी साकरले आहे. भारताने पूर्व आशियातील एक मोठी सत्ता म्हणून स्थानग्रहण करण्यासाठी एक भव्य व्यूहरचनेची आखणी केली आहे. संयुक्त राष्ट्रे, ASEAN, प्रादेशिक मंच, जी ८, दि शांघाय को-ऑपरेशन आर्गनायझेशन, पूर्व आशियाई शिखर परिषद आणि सर्वात महत्वाच्या अशा भारत-रशिया-चीन त्रीपक्षीय सहकार्य विषयक बैठक यासारख्या बहुपक्षीय स्तरावरदेखील भारत-चीन अधिकाऱ्यांमध्ये भेटीगाठी होत राहिल्या. १९९१ मध्ये भारताने उद्घोषित केलेले 'लुक ईस्ट' धोरण ही त्याचीच फलनिष्पती होती. (दाभाडे- २०१०:१५९)

भारताने आपला प्रतिस्पर्धी चीनसाठीही आपली अर्थव्यवस्था खुली केली. परिणामी २००६ मध्ये भारताशी सर्वाधिक व्यापार असलेले चीन हे दुसऱ्या क्रमांकाचे राष्ट्र बनवले. दोघांमध्ये १९९१ साली २६५ दशलक्ष डॉलर्सचा व्यापार होता. तो सन २००४ साली १३.६ अब्ज डॉलर्सपर्यंत पोहचला. २०१० पर्यंत हा ४० अब्ज डॉलर्स व्यापारी उलाढालीचे लक्ष्य गाठण्याचेही ठरविण्यात आले. दोन्ही देशांतील परस्पर गुंतवणुकीला उत्तेजन देणारा व त्यांच्या सुरक्षेची हमी देणारा करार ही पूर्ण झाल्याचे सांगण्यात आले. अर्थात सर्वात महत्वाची घोषणा म्हणजे दोन्ही देशांमधील प्रादेशिक व्यापार कराराची शक्यता व त्याच्या फायद्याची संयुक्त टास्क फोर्स ऑक्टोंबर २००७ पर्यंत आपल्या चर्चेचे निष्कर्ष सादर करेल असे सांगण्यात आले. भारताचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांनी २००६ मध्ये दिलेल्या चीनभेटीत दोन्ही देशांतील आर्थिक संबंध सुधारण्यावर विशेष भर दिला. दोन्ही देशांमधील सर्वकंष आर्थिक भागीदारीसाठी भारताने चर्चा फेरींचे सुतोवाच केला. जून २००५ मध्ये भारताने सिंगापूरशी देखील असाच करार केला.

### आग्नेय आशियाचे सामाजिक महत्व :-

पूर्व हिंद महासागरी प्रदेशातील बहुतेक देश मिळून आधुनिक आग्नेय आशियाई क्षेत्र तयार होते. उर्जा सुरक्षेच्या दृष्टीने आग्नेय आशिया महत्वाचा आहे. म्यानमार आणि व्हिएतनामध्ये नैसर्गिक वायूचे साठे आहेत. तर इंडोनेशियाकडे तेल आणि कोळसा मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे. हे भारताच्या उर्जा सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाचे देश आहेत. म्यानमारमधील राखाईन या किनारी क्षेत्रात दक्षिण कोरियन आणि भारतीय कंपन्या संयुक्तपणे नैसर्गिक वायूचे उत्खनन करत आहेत. हा वायू भारतात वाहून आणण्यासाठी जानेवारी २००५ मध्ये भारत, म्यानमार आणि बांग्लादेश यांच्यात एक करार झाला (सहस्त्रबुध्दे : २०१०:१८३). या विषयात जगातील इतर भागांप्रमाणेच आग्नेय आशियातही भारताला चीनची मोठी स्पर्धा आहे. म्यानमारमध्येही स्पर्धा

स्पष्टपणे दिसते. ASEAN देश आणि चीन यांच्या संबंधाला धक्का न लावता चीनशी उद्या शत्रुत्व न घेता ऊर्जास्त्रोतांसंबधीचे करार करणे हे आव्हान भारतासमोर आहे. मलाक्काची समुद्रध्वनी आणि जागतिक व्यापाराचे इतरही काही महत्वाचे सागरी मार्ग आग्नेय आशिसाई क्षेत्रातून जातात.त्यामुळे सागरी मार्गावर वर्चस्व असण्याची किमान त्या क्षेत्रात सागरी अस्तित्व असण्याची गरज निर्माण झाली आहे. चीनची अर्थव्यवस्था आज व्यापारावर बरीच अवलंबून आहे. परंतु चीनला फार मोठा समुद्रकिनारा नाही. त्यामुळे खोल समुद्रापर्यंत पोहचण्यासाठी दुसऱ्या देशांच्या बंदराचा आधार घेणे भाग पडते. हिंद महासागरातील कोको बेटावर चीनने अत्याधुनिक इंटेलिजन्स यंत्रणा विकसित केल्या आहेत. त्याला प्रत्युत्तर म्हणून भारताने अंदमान निकोबार बेटांवर त्रिसेना कमान स्थापन करण्याचा निर्णय घेतला.

**भारताच्या परराष्ट्र धोरणाची मर्यादा :-**

एक महत्वाची मर्यादा म्हणजे शेजारील राष्ट्रांच्या हालचाली व अर्थकरणाबाबतची अनास्था. पाकिस्तान व्याप्त काश्मिरमधील गिलगिट आणि बाल्टीस्थानच्या भागात चीनच्या मदतीने अनेक प्रकल्प पाकिस्तान सरकारने सुरु केले आहेत. चीन आणि पाकिस्तानला जोडणाऱ्या काराकोरम रस्त्याच्या रुंदीकरणाचे कामही वेगाने चालू आहे. त्याशिवाय दक्षिण आशियातील इतर राष्ट्रांशी चीन जवळचे संबंध निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहे. आशिया खंडात वर्चस्वासाठी भारताच्या शेजारील राष्ट्रांना आपल्या गटात समाविष्ट करण्याचा चीनचा प्रयत्न आहे. पाकिस्तानातील ग्वादार बंदराचा विकास श्रीलंकेतील हेबनटोटा बंदर, बांग्लदेशातील चितगाव बंदर, म्यानमारमधील क्याकफ्यू बंदराच्या विकासाचे कंत्राट चीनने मिळविले आहे. मालदीवमध्ये चीन पाणबुड्यांचाही तळ तयार होत आहे. आशियातील राष्ट्रांना आपल्या बाजूने वळवून भारताभोवतीची विळखा घट्ट करण्याचा चीन प्रयत्न करत आहे. चीनच्या या धोरणाला स्ट्रिंग ऑफ पर्ल्स असे म्हटले जाते. (पळसुले २०१३:२३) आशियातील या घडामोंडीकडे भारताने वेळीच लक्ष दिले पाहिजे. मालदीव, सेशेल्सबरोबर असलेल्या संबंधात वाढ करणे. जपान, तैवान, ऑस्ट्रेलिया, दक्षिण कोरीया यांच्याशी विशेष संबंध प्रस्थापित करणे, शेजारी राष्ट्रांशी असलेले व्यापारी संबंध वाढवून त्याव्दारे दक्षिण आशियात विश्वासर्हतेचे वातावरण निर्माण करणे यासारख्या उपाययोजना भारत करुन शकतो.

चीन बरोबर मैत्रीचे धोरण ठेवताना वेळप्रसंगी चीनबाबत सडेतोड भुमिका, कठोर कृती, घुसखोरीला पायबंद, चीनी व्यापारावर नियंत्रण, पाकिस्तान-चीन या भारत व्देषातून निर्माण झालेल्या मैत्रीवर करडी नजर व चीनसंबंधी भुमिका घेताना आंतरराष्ट्रीय समुदायाचा पाठींबा मिळविणे अशा गोष्टी भारताने केल्या पाहिजेत. भारत व चीनने आपल्यातील मतभेद कमी करुन सहकार्याची पावले उचलणे व्यापारी संबंधात आर्थिक लवचिकता आणणे, दोन्ही राष्ट्रांशी तडजोडीची तयारी ठेवणे. यामुळेच खऱ्या अर्थाने त्यांच्यातील संबंध सुधारतील.

**चीनची बदलती अर्थव्यवस्था :-**

डेंग झीआसो पिंग यांनी वैचारिक नेतृत्व केलेल्या सत्तरीच्या अखेरीस सुरु झालेल्या आर्थिक सुधारणांच्या प्रक्रियेने चीनचा अनेक अर्थाने कायापालट केला आहे. डेंग यांच्या आर्थिक धोरणानुसार परदेशी भांडवलाला चीनमध्ये गुंतवणूक करण्यासाठी दरवाजे उघडण्यात आले. गेली काही दशके परदेशी गुंतवणूक आकर्षित करणाऱ्या देशांमध्ये संपूर्ण जगात चीनचा दुसरा क्रमांक आहे. यातील बरीचशी गुंतवणूक निर्यातप्रधान उद्योग उभे करण्यासाठी किंवा आंतरराष्ट्रीय कंपन्यांच्या पुरवठादार कंपन्या स्थापन करण्यासाठी कारणी लागली आहे. चीनमध्ये बनणाऱ्या वस्तु प्रायतः अमेरिका (वाटा ३०%), युरोप (वाटा १६%) व जपान (वाटा २६%) या त्रयींकडे निर्यात होतात. अमेरिका, युरोप व जपानमधील बहुराष्ट्रीय कंपन्याच चीनमध्ये निर्यातप्रधान कारखाने काढण्यात पुढे असतात व त्यात तयार होणारा मालदेखील प्रामुख्याने याचा त्रिकुटाकडे निर्यात होत असतो. यामुळे चीनमध्ये उत्पादन होणाऱ्या काही ठरावीक उत्पादनामध्ये परदेशी कंपन्यांचा वाटा डोळयात भरण्यासारखा आहे हे खालील कोष्टकावरुन दिसून येईल.

| अ. क्र. | उद्योग | चीनमधून निर्यात होणाऱ्या मालातील परदेशी कंपन्यांचा वाटा (%) |
|---|---|---|
| १. | इलेक्ट्रॉनिक्स व दूरसंचार | ८२ % |
| २. | ऑफीसमध्ये लागणारे सामग्री | ७२ % |
| ३. | तयार कपडे व पादत्राणे | ४८ % |
| ४. | चामड्याच्या वस्तू | ४९ % |
| ५. | फर्निचर | ५१ % |
| ६. | शैक्षणिक व क्रीडा साहित्य | ६० % |
| ७. | प्लॅस्टिकच्या वस्तू | ४१ % |
| ८. | वाहने व वाहतूक साधने | ४२ % |

(संदर्भ : चांदोरकर : २०१६:३२)

माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार व तत्सम नवीन तंत्रज्ञानावर आधारीत ही साधने, गॅजेट्स जगात बनवतात. त्यांचा सर्वात मोठा पुरवठादार चीन आहे. चीनमध्ये बनणाऱ्या या वस्तूंच्या उत्पादनातील ८७% वाटा बहुराष्ट्रीय कंपन्यांचा आहे. पण या गॅजेट्समध्ये लागणाऱ्या जवळपास सर्व सुट्या

भागांचे उत्पादन या बहुराष्ट्रीय कंपन्या चीनमध्ये करीत नहीत. तर इतर कोणत्या तरी गरीब देशांमध्ये बनवून घेतात व चीनमध्ये आयात करतात. चीनमध्ये त्याची जुळणी व पॅकेजिंग केले जाते.

इंडोनेशिया, मलेशिया, सिंगापूर, फिलिफाइन्स, थायलंड या देशांमध्ये बहुराष्ट्रीय कंपन्यांनी विविध वस्तूंचे सुट्टे भाग बनवण्यासाठी खूप मोठी गुंतवणूक केली आहे. तेथे बनलेले सुट्टे भाग चीनमध्ये आयात केले जातात. सुट्टे भाग एक महाकाय यंत्रावर बनवले जातात. त्यासाठी भांडवली गुंतवणूक लागते. सुट्या भागांची जुळणी ही एक किचकट, अंग मेहनतीची प्रक्रिया आहे. जी जुळणी यंत्राव्दारे होऊ शकते. त्यापेक्षा जर मजूर स्वस्तात उपलब्ध असतील तर ती जुळणी यंत्रापेक्षा मानवी श्रमाव्दारे केली तर ती अधिक किफायतशीर ठरते. चीनमधील स्वस्तात उपलब्ध असणारा व शिस्तीत वागणारा मजूर हा त्यासाठी आदर्श ठरविला गेला आहे. अमेरिकेत ज्या मशीनवर आठ तास काम केल्यावर तेथील कामगाराला जे वेतन दिले जाते त्याच्या फक्त ४% रक्कम तेच काम करण्यासाठी चीनमधील कामगाराला दिले जाते. या आकडेवारीवरून उत्पादन केंद्र विकसित देशांमधून चीनमध्ये हलवण्यामुळे त्या उत्पादक कंपनीच्या नफ्यात किती मोठ्या प्रमाणात वाढ होऊ शकते ते ठळकपणे समोर येईल.

यावरुन हे लक्षात येईल की चीन म्हणजे जगाचा एक महाकाय कारखाना झाला आहे. दक्षिण आशियाई देशांमध्ये असणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पादन साखळीतील जुळणी करणारा प्लॅटफॉर्म झाला आहे. त्यासाठी चीनला जगाचा जुळणी कारखाना म्हणणे अधिक संयुक्तीक होईल. चीनच्या स्वस्त व कुशल कामगारांमुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांनी आपले जुळणी कारखाने चीनमध्ये हलविले. ऐंशीच्या दशकापासून इतर दक्षिण आशियाई देशांमधून सुट्या भागांची मोठ्या प्रमाणावर चीनमध्ये आयात होऊ लागली. उदा. १९९२ ते २००८ या काळात चीनमध्ये आयात होणाऱ्या सुट्या भागांचे आयात मुल्य २४ पटीने वाढले आहे. (चांदोरकर : २०१६ : ३९)

### भारत चीन व्यापारी आणि आर्थिक संबंध :-

मागील काही वर्षापासून व्यापार व आर्थिक संबंधात अमुलाग्र वाढ होत आहे. भारत आणि चीनमधील, व्दिपक्षीय व्यापार २००० साली २.९२ बिलियन डॉलर एवढा होता. तो २००८ मध्ये ४१.८५ बिलियन डॉलर एवढी वाढ झाली. त्यामुळे चीन हा अमेरीकेला मागे सारुन भारताचा सर्वात मोठा व्यापारी सहकारी झाला आहे. २०१४ मध्ये भारत चीन व्दिपक्षीय व्यापार ७०.६५ बिलियन डॉलर एवढा वाढला. भारताने चीनला १६.४१ बिलियन डॉलर निर्यात केली. तर चीनने भारताला ५४.४२ बिलियन डॉलर निर्यात केली. २०१४ मध्ये ३७.८ बिलियन डॉलर एवढी भारताला व्यापारी तुट सोसावी लागली. व्यापाराशिवाय भारत सर्वात मोठा प्रकल्प निर्यातासाठी चीनला बाजारपेठ पुरवितो. नुकतीच अंमलबजावणी खालील प्रकल्प ६० बिलियन डॉलरपेक्षा जास्त आहेत. चीनी मोजणीनुसार चीनची भारतातील सप्टेंबर २०१४ ची २.६३ बिलियन डॉलरपर्यंत गुंतवणूक आहे. तर भारताची चीनमध्ये ०.५५ बिलियन डॉलरपर्यंत गुंतवणूक आहे (http://www.indianembassy.org.cn).

### वन बेल्ट, वन रोड धोरण :-

परराष्ट्र नितीला अनेक पैलू असतात. ज्यात व्यापार, आर्थिक व तंत्रज्ञानाची मदत आणि सहकार्य यांचा महत्वाचा वाटा असतो. या क्षेत्रातही चीनने आघाडी घेतली आहे. या धोरणाला त्यांनी वन बेल्ट, वन रोड किंवा ओबॉर (एक दोर एक मार्ग) असे नाव दिले आहे. धोरणाचे उद्देश व विस्तार समजायला त्याचे विस्तृत वर्णन करणे आवश्यक आहे.

चीन आज आर्थिक, व्यापार आणि उत्पादन क्षेत्रात महासत्ता मानला जातो व आपला प्रभाव वाढवण्यासाठी त्याने तिन्ही क्षेत्रात परराष्ट्र देशांशी संबंध विकसित करण्यासाठी हे धोरण आणि संलग्न योजना अंगिकारल्या आहेत. पाश्चिमात्य साम्राज्य अस्तित्वात असण्यापूर्वी चीन जगातील एक महासत्ता होती, भारताचे पण असेच स्थान होते. चीनने रेशीम, दारुगोळ्याचे तंत्रज्ञान, छपाई यंत्रणा यांच्यासाठी कठीण प्रवास करुन व्यापार केला जाई. सागरी मार्गावरही चीनचे प्रभुत्व होते. पंधराव्या शतकात चिनी सरश्वेल झेंग ही याचे आरमार आफ्रिकेच्या पूर्व तटावर पोहोचले होते व श्रीलंकेत झेंग हीने १४८० च्या सुमारास आजच्या हंबनतोटा परिसरात छोटे राज्य वसवले होते. आठराव्या शतकात चीन पाश्चिमात्य साम्राज्यशक्तींचा अधीन झाला आता त्याच देशांना चीन आव्हान देत आहे व तेच देश आज चीनकडून आर्थिक बळ व गुंतवणुकीच्या शोधात आहेत. चीनचे अध्यक्ष शी जिनपिंगना याची जाणीव असून ते पूर्ण फायदा घेण्यास योजनाबध्द आहेत.

ओबॉर ही त्यांची महत्वाची आघाडी अूसन याचा विस्तार किती मोठा आहे ते या वर्षाच्या प्रमुख योजना पाहून कल्पना येते. एप्रिल २०१६ मध्ये चीनने ग्रीसच्या पिरायूस बंदराच्या प्रकल्पात मोठा वाटा प्राप्त केला आहे व बंदराच्या विकासासह त्यांची हंगेरीसाठी जर्मनीपर्यंत जलद गतीची रेल्वे बांधण्याची योजना आहे. यामुळे चीनला भूमध्य सागरात प्रवेश आणि तळ मिळतो व युरोपच्या मध्यवर्ती भागापर्यंत प्रभाव पसरण्याची संधी मिळते असे केले की त्यांना चीनपासून सुएझ कालव्यातून युरोपपर्यंत सागरी मार्ग उपलब्ध होईल व रेल्वेमुळे ग्रीस ते हंगेरी आणि जर्मनीपर्यंत भूभाग वापरायला मिळेल. ही महत्वकांक्षी योजना किती सफल होते हे अनेक कारणांवर अवलंबून राहील. पण मुख्य म्हणजे चीनकडे या प्रकल्पासाठी लागणारा निधी, तंत्रज्ञान व मनुष्यबळ आहे हे जाहीर होते. तसेच या वर्षी चीनने पाकिस्तानमध्ये आण्विक प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यावर काम सुरु केले आहे. या आधी चीनने पाकिस्तानला ४६ अब्ज डॉलरचे प्रकल्प बांधण्याचे आश्वासन दिले आहे. ज्यात काराकोरम महामार्गाचा विकास व त्याला ग्वादार बंदराशी जोडण्याची योजना व बंदराचा विस्तार यांचा समावेश आहे. थार वाळवंटात कोळशाच्या खाणीचा विस्तार करण्याचाही बेत आहे. (पळसोकर, रविवार १७ जुलै २०१६, म. टा. पुणे) या सर्व योजनांमुळे चीनचे अनेक हेतू साध्य होतात. पाकिस्तानशी मैत्री वाढवणे, त्यांना भारताविरुध्द प्रवृत्त करणे आणि गरज पडल्यास तेथील धावपट्ट्या बंदरे यांचा वापर करण्यासाठी पाकिस्तानला बंधनकारक ठेवता येईल. तसेच श्रीलंकेत हंबनतोटा आणि आता कोलंबो बंदरांचा विकासाच्या योजना कार्यरत आहेत. याच्यामुळे १४ व्या शतकातील झेंग ही याच्या सागरी मोहिमेच्या आठवणीची उजळणी होते. सर्व प्रकल्पांबरोबर आफ्रिकेच्या पूर्व तटावरील देशांपासून म्यानमार, थायलंड ते मलेशियापर्यंत मदतकार्ये हाती घेऊन चीन ओबॉरचा विस्तार किती भव्य आहे

याचे प्रदर्शन करीत आहे. एकूणच सर्व प्रकल्पांसाठी सुमारे एक ट्रिलियन (एक हजार अब्ज) डॉलरची गुंतवणूक पुढील दशकात अपेक्षित आहे. या योजना किती सफल व कार्यान्वित होतील ही पुढचा काळ दाखवेल.

हे सर्व करण्याचा चीनचा काय हेतू असावा, याचे उत्तर सोपे आहे. २०११ मध्ये अध्यक्ष
झाल्यानंतर शी जिनपिंग हे आपले स्थान देशाच्या अंतर्गत राजकारणात दृढ करण्यात यशस्वी होत आहेत असे दिसते. जगभर गुंतवणूक करताना चीनचे महत्व वाढणार यामुळे चीन अमेरिकेला प्रत्येक क्षेत्रात आव्हान देत आहे. दक्षिण चीन समुद्रातील तिढा या पार्श्वभूमीवर पाहिला, तर चीनच्या सर्व योजनांमागे स्वतःचे महत्व वाढवण्याचा हेतू दिसतो. आणि त्यांनी अपेक्षा असावी की जग त्यांच्याकडे नेतृत्वाच्या भुमिकेतून पाहील. जागतिक बँकेला पर्याय म्हणून स्थापन केलेली आशिया दळणवळण गुंतवणूक बँक हे ज्यात भारताचाही वाटा आहे याचे चांगले उदाहरण आहे.

चीनच्या या वागणुकीमुळे इतर देशांना भय वाटले तर त्यात नवल नाही. खास करुन शेजारी देश जपान, दक्षिण कोरिया, व्हिएतनाम, फिलिपिन्स हे इतर देशांशी मैत्रीचे संबंध वाढवायला उत्सुक आहेत. इथे भारताची भुमिका महत्वाची होते. चीनच्या तुलनेत अनेक क्षेत्रात भारत मागे असला तरी झपाट्याने वाढणारी आर्थिक व्यवस्था, सामाजिक सामर्थ्य व त्याहून मुख्य म्हणजे हिंदी महासागरात भारताचे सामाजिक-भौगोलिक स्थान हे भारताचे महत्व वाढवतात. या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या परराष्ट्र दौऱ्याचा उद्देश समजतो. त्यात ते किती यशस्वी होतील ते देशाच्या अंतर्गत सुव्यवस्था आणि राजकारणावर अवलंबून असेल.

## निष्कर्ष :-

आशिया खंडात वर्चस्वासाठी भारताच्या शेजारी राष्ट्रांना आपल्या गटात समाविष्ट करण्याचा चीनचा प्रयत्न आहे. आशियातील राष्ट्रांना आपल्या बाजूने वळवून भारताभोवतीचा विळखा घट्ट करण्याचा चीन प्रयत्न करतो आहे. चीनच्या या धोरणाला 'स्ट्रिंग ऑफ पर्ल्स' असे म्हटले जाते. भारताने हे वेळीच ओळखायला हवे. चीनच्या संदर्भात धोरण आखताना भारताने दक्षिण आशियावरील नियंत्रण व आर्थिक हितसंबंधाचा विचार केला पाहिजे.

वेगाने विकसित होणाऱ्या चीनला भारतासारख्या मोठ्या बाजारपेठेची गरज आहे. भारतालाही आर्थिक विकासासाठी मोठ्या प्रमाणावर विदेशी गुंतवणूक आवश्यक आहे. माहिती तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात भारत आघाडीवर आहे याची चीनला जाणीव आहे. याचा फायदा भारताने करुन घेतला पाहिजे. देशाच्या सुरक्षेला ज्यातून बाधा होणार नाही अशा क्षेत्रात चिनी गुंतवणुकीचे स्वागत केले पाहिजे.

चीन बरोबर मैत्रीचे धोरण ठेवताना वेळप्रसंगी चीनबाबत सडेतोड भुमिका, कठोर कृती, घुसखोरीला पायबंद, चीनी व्यापारावर नियंत्रण, पाकिस्तान-चीन या भारत व्देषातून निर्माण झालेल्या मैत्रीवर करडी नजर व चीनसंबंधी भुमिका घेताना आंतरराष्ट्रीय समुदायाचा पाठींबा मिळविणे अशा गोष्टी भारताने केल्या पाहिजेत. भारत व चीनने आपल्यातील मतभेद कमी करुन सहकार्याची पावले उचलणे व्यापारी संबंधात आर्थिक लवचिकता आणणे, दोन्ही राष्ट्रांशी तडजोडीची तयारी ठेवणे. यामुळेच खऱ्या अर्थाने त्यांच्यातील संबंध सुधारतील.

माहिती तंत्रज्ञान, दूरसंचार व तत्सम नवीन तंत्रज्ञानावर आधारीत ही साधने, गॅजेट्स जगात बनवतात. त्यांचा सर्वात मोठा पुरवठादार चीन आहे. चीन म्हणजे जगाचा एक महाकाय कारखाना झाला आहे. दक्षिण आशियाई देशांमध्ये असणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या उत्पादन साखळीतील जुळणी करणारा प्लॅटफॉर्म झाला आहे. त्यासाठी चीनला जगाचा जुळणी कारखाना म्हणणे अधिक संयुक्तीक होईल.
चीनच्या तुलनेत अनेक क्षेत्रात भारत मागे असला तरी झपाट्याने वाढणारी आर्थिक व्यवस्था, सामाजिक सामर्थ्य व त्याहून मुख्य म्हणजे हिंदी महासागरात भारताचे सामाजिक-भौगोलिक स्थान हे भारताचे महत्व वाढवतात. या संदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या परराष्ट्र दौऱ्याचा उद्देश समजतो. त्यात ते किती यशस्वी होतील ते देशाच्या अंतर्गत सुव्यवस्था आणि राजकारणावर अवलंबून असेल. एकविसव्या शतकात भारत-चीन ही सर्वात प्रभावी असतील. म्हणून जागतिक शांतता व स्थैर्य स्थापण्यासाठी अमेरिका-चीन-भारत म्हणजे P-3 चे सहकार्य अत्यंत महत्वाचे असणार आहे.

## संदर्भ


- देवळाणकर शैलेंद्र, (२०१०), भारत आणि आंतरराष्ट्रीय भू राजकारण, लोक वाङःमय गृह, मुंबई. (निवडक समाज प्रबोधन पत्रिका खंड-२)
- दाभाडे मनीषा, (२०१०), भारत आणि आंतरराष्ट्रीय भू राजकारण, लोक वाङःमय गृह, मुंबई. (निवडक समाज प्रबोधन पत्रिका खंड-२)
- पिअर्सन नतालिया ओबिको, (२०१५), नेपाळमधील भारताच्या मक्तेदारीला चीनचे आव्हान, परिवर्तनाचा वाटसरू, अंक १९, पुणे
- चांदोरकर संजीव, (२०१६), डेंगचा समाजवादी चीन : नाव मोठे लक्षण खोटे, परिवर्तनचा वाटसरु अंक १७, पुणे.
- पळसुले वैभवी, (२०१३), भारत आणि चीन संबंधांचे बदलते संदर्भ, परिवर्तनाचा वाटसरू अंक १७, पुणे.
- पळसोकर आर. आर., (१७ जुलै २०१६), महाराष्ट्र टाईम्स, मुंबई.
- Embassy of India, Beijing website: http://www.indianembassy.org.cn/